ती.....

आज ऑफिस मधून निघायला खूपच उशीर झाला होता. रात्रीचे पावणे बारा वाजले होते. सध्या US चा प्रोजेक्ट चालू होता. रोजच  उशीर होत  होता. पण आज मीटिंग जरा जास्तच लांबली होती.

नेहाचे बरेच मेसेज होते.

"निघालास की फोन कर. गाडी सावकाश चालव."

"आपण ह्या भागात नवीन आहोत. तेव्हा काळजी घे."

"वाटेत कुणी लिफ्ट मागितली तरी गाडी थांबवू नकोस. आजकाल काही भलतं कानावर येत असतं. आजच्या पेपरमधे  आपल्याच  भागातली  एक  खुनाची  बातमी  आलीय.”

मी तिचे सर्व मेसेज आता वाचले. मीटिंगमुळे वेळच झाला नव्हता.  नेहाला   गाडीतून फोन करावा. आता  केला  तर ती  फोनवर  दहा  गोष्टी सांगत  बसेल. आता अजून उशीर करायला नको. असा विचार करून मी  निघालो.

H R डिपार्टमेंटचा राहुल पण निघाला होता. माझा घरी जाण्याचा रस्ता त्याच्या घरावरूनच होता.  त्याचं घर माझ्या घराच्या आधी होतं. त्याला म्हणालो, "तुला सोडतो तुझ्या घरापाशी. दोघं एकत्रच जाऊ."

आम्ही दोघं निघालो. ऑफिस, नवा प्रोजेक्ट ह्यावर दोघांच्या गप्पा चालू होत्या. त्याच्याशी  बोलण्याच्या  नादात नेहाला फोन करायचा राहून गेला.

मधेच बोलता बोलता राहुल म्हणाला, "नव्या जागेत सर्व मार्गी लागलं ना? तो भाग नव्याने डेव्हलप होतो आहे. वस्ती तशी फार नाही. हळूहळू वाढेल. मधला रस्ता जरा सुनसान आहे. रात्री अपरात्री तिथून जाताना काळजी घे. हल्ली म्हणे बऱ्याचदा चोऱ्या होतात त्या रस्त्याला. आज पेपरमधे त्या रस्त्याला मर्डर झाल्याची घटना घडली अशी बातमी होती. आज जरा जास्तच उशीर झालाय आपल्याला."

राहुलच्या घराच्या गल्लीपाशीच तो उतरतो म्हणाला.

नेहा वाट पहात असेल म्हणून मी पण आतपर्यंत न जाता पुढे निघालो.

थोडं पुढे गेलो . एक तरुणी रस्त्याच्या कडेने चालत असलेली कारच्या हेडलाईटमधे दिसली. पंजाबी ड्रेस आणि खांद्याला पर्स होती.  ही  एवढ्या रात्री  एकटीच  चाललीय?  कामावरून घरी निघालेली दिसतेय. तिला रिक्षा, टॅक्सी मिळाली नसावी. म्हणून अशी चालत निघाली असावी.

नेहाचा मेसेज आणि नुकतंच राहुलने सांगितलेलं मला आठवलं.

त्या मुलीने लिफ्ट मागितली तरी गाडी थांबवायची नाही असं मी पक्कं ठरवलं.

तिच्या सोबत किंवा आजूबाजूला जवळपास कुणी आहे का अशी मी खातरजमा करून घेत होतो. गाडीचा स्पीड  थोडा कमी केला.

ती एकटीच होती. झपाझप पावलं टाकत एकटीच चालली होती.

माझी गाडी दिसताच ती माझ्याकडे लिफ्ट मागेल असा मी होरा बांधला. तो खराही निघाला. पण मी निग्रहाने गाडी सावकाश तशीच पुढे नेली. गाडीच्या मिरर मधून तिच्यावर लक्ष ठेऊन होतो. ती तशीच पुढे चालत राहिली. एकटीच. राहुलने सांगितलेलं परत आठवलं. आजच्या पेपरमधे कुणाच्या तरी खुनाची बातमी आलीय म्हणत होता. आता ह्या रस्त्यावर ही मुलगी अशी एकटीच चाललीय.

त्या निर्मनुष्य रस्त्यावर माझी गाडी सोडल्यास काहीही नव्हतं. बरंच अंतर ती चालल्यावर मलाच तिची दया आली. मी गाडी थांबवली. ती गाडीपर्यंत पोचली. पण माझ्याकडे दुर्लक्ष करून ती तशीच पुढे चालत राहिली.

मी गाडीची काच खाली करून तिच्याशी बोलायचं ठरवलं.

"हॅलो, एवढ्या रात्री आपण एकट्याच कुठे जाताय? तुम्हाला कुठे जायचं आहे? रात्रीच्या वेळी एकटं जाताना भीती नाही वाटत?" मी तिला विचारलं.

तिने माझ्याकडे रोखून पहात म्हटलं, "कुणाची भीती? आता भीती वाटण्यासारखं काही उरलं नाही."

"कुठे राहता तुम्ही? मी सोडू का तुम्हाला?" मी म्हणालो.

नेहाने मेसेज, राहुलने सांगितलेलं सर्व आठवलं. पण तरीही.....

अशी रात्रीची वेळ. ती एकटीच निघालीय.

मी गाडीचा दरवाजा उघडला. ती आत येऊन बसली.

"कुठे राहता तुम्ही? कुठे सोडू तुम्हाला?" मी विचारलं.

तिने माझ्याच कॉलनीचं नाव सांगितलं.

"कॉलनीत शिरल्यावरची पहिलीच बिल्डिंग." ती म्हणाली.

"मीही त्याच कॉलनीत रहातो. शेवटच्या विंगमधे. पण तुम्ही इतक्या उशीरा...? ऑफिस मधे एवढा उशीर होतो?" मी.

"रोज होत नाही. पहिल्यांदाच झाला." ती.

ती जेवढ्यास तेवढी उत्तरं देत होती.

"कोणत्या कंपनीत जॉब करता?" मी विचारलं.

तिने उत्तर दिलं नाही. एखाद्याला नाही आवडत अनोळखी कुणाशी बोलायला, असं समजून मी गप्प बसलो.

पंधरा एक मिनिटात आम्ही कॉलनीपाशी पोचलो. लांबून कॉलनीचं मुख्य गेट आणि कमान दिसली.

ती म्हणाली, "मी इथेच उतरते. आत पोलिस व्हॅन आहे."

मला काही एवढ्या लांबून बंद गेटच्या आतली पोलिसांची गाडी दिसली नव्हती.

"ठीक आहे" म्हणत मी गाडी थांबवली. ती गाडीतून खाली उतरली.

मोबाईलवर मेसेज वाजला.

"निघालास का?" नेहाचा मेसेज होता.

आता दोन मिनिटात घरी पोचणारच होतो. म्हणून नेहाला मेसेज केला नाही.

गाडी चालू करून पुढे आलो. मिररमधून त्या  मुलीला पाहायचा प्रयत्न केला. पण ती दिसली नाही. कॉलनीचं गेट तर पुढे होतं. ती कुठुन गेली आत?

गेटपाशी पोलिसांनी अडवलं. वॉचमनने माझी ओळख सांगितल्यावर त्यांनी गाडी उघडून तपासली. मग मला आत जाऊ दिलं.

बिल्डिंगच्या पार्किंगमधे गाडी पार्क करून लिफ्टने वर आलो.

दारात मीच असल्याची खात्री करून नेहाने दार उघडलं. ती काळजीत. खूप घाबरलेली दिसली.

"मेसेज फोन केला नाहीस? गेटपाशी पोलीस आहेत का रे अजून? अरे, काल रात्री आपल्या कॉलनीतल्या पहिल्या विंगमधे रहात असलेल्या एका मुलीवर रस्त्यात कुणीतरी रेप केला. आणि नंतर तिचा खून केला. तिची डेड बॉडी सापडली. पर्स, मोबाईल, कंपनीचं कार्ड वगैरे सापडलं. त्यावरून ती कोण, कुठे राहते ते पोलिसांना कळलं. पण खुनी गायब आहे. आपल्या कॉलनीत सगळ्यांच्या कडे जाऊन पोलीस झडती घेतायत. दुपारपासून हे सत्र सुरू आहे. आजच्या पेपरमधे पण आलीय बातमी. कळलं तेव्हापासून मला जाम भीती वाटतेय. आज संध्याकाळी तुझ्या महत्त्वाच्या मिटिंग होत्या म्हणून तुला कॉल केला नाही."

बोलता बोलता नेहाने आजच्या पेपरमधली बातमी आणि त्या मुलीचा फोटो दाखवला.

तिचा फोटो पाहताच मी दचकलो.

"ही मुलगी?" मी ओरडूनच विचारलं.

"तू ओळखतोस हिला? तुमच्या कंपनीत होती?"

"न... नाही. मी नाही ओळखत."

माझ्या हाता पायांना कंप सुटला होता. मी प्रचंड घाबरलो. माझ्या घशाला कोरड पडली.

पेपरमधला फोटो त्या मुलीचा? तिचा खून झालाय? कसं शक्य आहे?

आता काही मिनीटांपूर्वी मी माझ्या गाडीतून तिला लिफ्ट दिली होती. कॉलनीच्या मेन गेटच्या थोडं आधीच तर ती उतरली गाडीतून.

म्हणजे ती.....

– लीना माटे

मो. 9819534428

Email - leenashining@gmail.com